पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय,
क्रमांक-नस/७/कावि/१५०१/२००९
दिनांक- ३०/१०/२००९

प्रति,
मा. ......................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा दिनांक ०३.११.२००९ रोजी आयोजित केलेबाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दनांक ०३.११.२००९ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

प्रत:- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
## मा.स्थायी समिती
## कार्यपत्रिका क्रमांक- १३९

दिनांक- ०३.११.२००९ वेळ- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक ०३.११.२००९ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

दिनांक २७.१०.२००९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १३८) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्रमांक- १) मा.क्रिडा समिती सभा दिनांक २४/८/२००९ ठराव क्र.१२ नुसार, पिंपरी चिंचवड मनपाच्या एकुण ७१ व्यायामशाळा आहेत. त्यातील ३० व्यायामशाळा सेवाशुल्क देवुन सार्वजनिक संस्था / मंडळांना चालविण्यास दिलेल्या असून त्यापैकी से.नं.२२, झेड क्लस्टर ओटा स्किम, निगडी व्यायामशाळा श्रीराम भवन हनुमान तरुण मंडळाने ११ महिने भाडे कराराने चालविण्यास मिळणेबाबत विनंती केली असल्याने त्यांना ११ महिने कराराने करारनाम्यातील अटी शर्तीनुसार दरमहा र.रु.१८००/- सेवाशुल्क देवुन व्यायामशाळा चालविण्यास देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.०३.११.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- २) मा.क्रिडा समिती सभा दिनांक २४/८/२००९ ठराव क्र.१३ नुसार, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या एकुण ७१ व्यायामशाळा आहेत. त्यातील ३० व्यायामशाळा सेवाशुल्क देवुन सार्वजनिक संस्था / मंडळांना चालविण्यास दिलेल्या असून त्यापैकी राजर्षी शाहु महाराज कै.अण्णाभाउ साठे नगर, निगडी व्यायामशाळा, सम्यक क्रांती मित्र मंडळाने ११ महिने भाडे कराराने चालविण्यास मिळणेबाबत विनंती केली असल्याने ११ महिने कराराने करारनाम्यातील अटी शर्तीनुसार दरमहा र.रु.१८००/- सेवाशुल्क देउन व्यायामशाळा चालविण्यास देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.०३.११.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ३) मनपाच्या पाणीपुरवठा व जलनिःसारण विभागाचे वापराकरीता टाटा एल.पी.टी.७१२/३८ बी.एस. III कॅब विथ साईड पी.टी.ओ. या मॉडेलची एक नग चॅसिज खरेदी करून त्यावर मनपा स्पेसिफिकेशन प्रमाणे ३००० लि. क्षमतेची जेटींग यंत्रणा (एक नग) र.रू.१५,१३,०३६/- (सर्व करासहीत), टाटा एल.पी.टी. १११२/४२ बी.एस.III कॅब विथ साईड पी.टी.ओ. या मॉडेलची एक नग चॅसिज खरेदी करून त्यावर मनपा स्पेसिफिकेशन प्रमाणे ६००० लि.क्षमतेची जेटींग यंत्रणा (एक नग) र.रू. १७,९७,१२६/- (सर्व करासहीत) व टाटा एल.पी.टी.१६१५/४२ बी.एस.III विथ साईड पी.टी.ओ. या मॉडेलची दोन नग चॅसिज खरेदी करून त्यावर मनपा स्पेसिफिकेशन प्रमाणे ८००० लि.क्षमतेची जेटींग कम सक्शन यंत्रणा र.रू.२२,९१,७६०=४० (प्रती नग) प्रमाणे दोन नग जेटींग कम सक्शन यंत्रणा र.रू. ४५,८३,५२०=८० (पुर्णांकीत र.रू.४५,८३,५२१/-) असे एकूण चार नग यंत्रणा मे.एम.एस.एस.आय.डी.सी., पुणे यांचेकडून र.रू.७८,९३,६८३/- (सर्व करासहीत) त्यांचे समवेत करारनामा करून खरेदी करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.०३.११.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ४) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२९/२००७-०८ मधील अ.क्र.९४ अन्वये, पिंपरी वाघेरे प्रभाग क्र.७३ मधिल यशवंतराव चव्हाण स्टेडियमचे दुरुस्ती, नुतनीकरण व इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.शिवम एंटरप्रायझेस (नि.र.रू. ४६,४३,२५६/- [र.रू.शेहचाळीस लाख त्रेचाळीस हजार दोनशे छपन्न] पेक्षा ००.५० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने काम करून घेण्यास तसेच निविदा अटीनुसार निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.०३.११.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ५) दवाखाने/रुग्णालयांची सध्याची आवश्यक मागणी लक्षात घेऊन पुढील पुरवठा आदेश द्यावे लागणार असुन STP कडून E-Tendering पद्धतीने औषधे/साहित्य निविदा प्रक्रिया Demo पूर्ण होऊन निविदाधारकांना दर भरणेसाठी १५ ते २१ दिवस मुदत द्यावी लागणार असल्याने STP कडून २९/९/२००९ रोजी Demo होऊन निविदा प्रसिद्धी करणे Finalise झालेस संपुर्ण

निविदा प्रक्रिया ऑक्टोबर २००९ अखेर पुर्ण होईल तोपर्यंत दवाखाने/ रुग्णालयासाठी आवश्यक असणाऱ्या औषधे/साहित्य खेरदीकामी र.रु.१,५०,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.०३.११.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ६) श्री.पांडुरंग निवृत्ती वेताळ,कचराकुली यांच्यावर खातेनिहाय चौकशीमध्ये सिद्ध झालेले दोषारोप,अंतिम नोटीसचा त्यांचा खुलासा व चौकशीनंतरही त्यांची मोठ्या प्रमाणातील गैरहजेरी यानुसार श्री.वेताळ यांच्या वर्तनात सुधारणा होत नसल्याने त्यांना सेवेतून काढून टाकण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.०३.११.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ७) ब प्रभागांतर्गत वॉर्ड क्र.५७ मधील किवळेगाव रस्त्यावरील लघुदाब पोल व तारा हलविणे या कामाकरीता २००९-१० चे अंदाजपत्रकात पानांक ४९१ अ क्र.३ वर [नि.नोटीस क्र.३/८ ०८-०९] एकुण रक्कम रु.१० लाख इतकी तरतुद करणेत आली असली तरी सदरचे काम पुढील आर्थिक वर्षात करावयाचे असल्याने सदर कामाकरीताच्या र.रु.१० लाख रुपये तरतुदमधुन रक्कम रुपये ७ लाख तरतुद ब प्रभागाअंतर्गत वॉर्ड क्र.६२ मधील दळवीनगर, भोईरनगर या भागातील रस्ता रुंदीकरणातील व शहर सुशोभिकरण अंतर्गत लघुदाब पोल व तारा हलविणे (नि.नोटीस क्र.३/४ ०८-०९) या कामाकरीता वर्ग करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.०३.११.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ८) BRT रुट नं.१ व २ जगताप डेअरी ते नाशिक फाटा व काळेवाडी फाटा ते देहुरोड या नियोजित मार्गामधील सर्व्हेक्षण व त्याचा अहवाल या कामासाठी श्री.व्ही.व्ही.कुलकर्णी यांची निविदा न मागविता करारनामा न करता नेमणुक करणेस व याकामी होणाऱ्या र.रु.२,००,०००/- [र.रू.दोन लाख] खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ९) मनपाच्या विद्युत-भुगयो विभागाकरीताच्या क अंदाजपत्रकातील भांडवली खर्चाअंतर्गतच्या भुगयो विद्युत-नविन कामे व भुगयो विद्युत - देखभाल दुरुस्ती कामांच्या तरतुदींचे अंतर्गत वर्गीकरण करुन उपलब्ध होणारी प्रपत्र ‘अ’ नुसार र.रू.१,६०,००,०००/- तरतुद चालन देखभाल दुरुस्तीच्या अत्यावश्यक कामांकरीता प्रपत्र ‘ब’ नुसार वर्गीकरण करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १०) मनपाच्या विद्युत विभागा कडील नि.नो.क्र.३/०८/०९ मधील अ.क्र.४ अन्वये, प्र.क्र.३२ (नविन वॉर्ड क्र.६२) मधील दळवीनगर,भोईरनगर, भोईरनगर भागातील रस्ता रुंदीकरणातील व शहर सुशोभिकरण अंतर्गत लघुदाब पोल व तारा हलविणेकामी मे.सुमी इलेक्ट्रीकल्स् सर्व्हिसेस [नि.र.रु.४६,४०,११७/- (सेहेचाळीस लाख चाळीस हजार एकशे सतरा) पेक्षा ३० % जास्त (स्विकृतीयोग्य दरापेक्षा ११.४० % कमी] या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ११) मनपाच्या विद्युत विभागा कडील नि.नो.क्र.४/०९/१० मधील अ.क्र.१६ अन्वये, अ प्रभागाअंतर्गत वॉर्ड क्र.३७ चिंचवड स्टेशनमधील स्ट्रीटलाईट दिव्यांचे नुतनीकरण करणेकामी मे.सुमी इलेक्ट्रीकल सर्व्हिसेस [नि.र.रु.८२,१५,४९४/- (ब्याऐंशी लाख पंधरा हजार चारशे चौऱ्याण्णव) पेक्षा ३६.३६% कमी] या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १२) पिंपरी चिंचवड शहरातील मुख्य रस्त्यावरील वाहतूक सुरक्षिततेसाठी झेब्रा पेंटींग, रोड मार्कींग इ. कामे करणेकामी कामाची निकड पाहता मे.हर्षद शेख यांच्याकडून अंदाजपत्रकिय दराच्या १०% कमी दराने थेट पद्धतीने करुन घेणेस व निवीदा न मागविता थेट पद्धतीने काम करण्यासाठी करारनामा करणेस व सदर कामाकरिता अं.र.रु.१०,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १३) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२९/२००७-०८ मधील अ.क्र.१६४ अन्वये, आकुर्डी वॉर्ड क्र.५२ येथे रुपेश कॉलनी साईपूजा बाग येथील रस्ते डब्यू.बी.एम. व हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणेकामी मे.मोहनलाल मथरानी कन्स्ट्रक्शन कं. [अंदाजपत्रकीय दर] या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.४४,३८,९७२/- [र.रू. चव्वेचाळीस लाख अडोतीस हजार नऊशे बहात्तर] पर्यंत काम करून घेण्यास तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १४) पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील शहर वाहतुकीचे नियोजनाकरीता श्री.भुमकर एस.एन., सेवानिवृत्त सहाय्यक पोलिस आयुक्त यांची वाहतुक तांत्रिक सल्लागार (असिस्टंट ट्रान्सपोर्ट प्लॅनर) म्हणून दि.२८/८/२००९ पासून पुढे सहा महिने कालावधीकरीता दरमहा र.रु.१२,०००/- एकत्रित मानधनावर नेमणुक करणेस व कामाचा पाठपुरावा करणेकामी वाहनचालकासह महापालिकेचे वाहन व भ्रमणध्वनीकरीता महापालिका ग्रुपचे सिमकार्ड उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १५) मनपाच्या आरोग्य विभागाकडील नि.नो.क्र.४/२००८-०९ अन्वये, ड प्रभाग वॉर्ड क्र.८९ विशालनगर या ठिकाणाचे साफसफाई कामी मे.सावित्रीबाई स्वयं.सेवा सह.संस्था मर्या. [निविदा रकमेच्या ७% कमी एकुण र.रू.२०,८२,७६८/- [र.रू.वीस लाख ब्याऐंशी हजार सातशे अडुसष्ट] ] यांचेशी कामाचा करारनामा करणेस व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(नि.र.रू.२२,३९,५३६/-)

विषय क्रमांक- १६) मनपाच्या आरोग्य विभागाकडील नि.नो.क्र.४/२००८-०९ अन्वये, ड प्रभाग वॉर्ड क्र.८२ थेरगांव गावठाण या ठिकाणाचे साफसफाई कामी मे.व्यंकटेश स्वयं.सेवा सह.संस्था [निविदा रकमेच्या १०% कमी एकुण र.रू.९,५७,१२८/- [र.रू.नऊ लाख सत्तावन्न हजार एकशे अठ्ठावीस] ] यांचेशी कामाचा करारनामा करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(नि.र.रू.१०,६३,४७६/-)

विषय क्रमांक- १७) मनपाच्या आरोग्य विभागाकडील नि.नो.क्र.४/२००८-०९ अन्वये, ड प्रभाग वॉर्ड क्र.७७ श्रीनगर या ठिकाणाचे साफसफाई कामी मे.भगवती स्वयं.सेवा सह. संस्था मर्या. [निविदा रकमेच्या २८.१० % कमी एकुण र.रू.१२,०३,०३७/- [र.रू.बारा लाख तीन हजार सदोतीस] ] यांचेशी कामाचा करारनामा करणेस व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(नि.र.रू.१६,७३,२०८/-)

विषय क्रमांक- १८) मनपाच्या आरोग्य विभागाकडील नि.नो.क्र.४/२००८-०९ अन्वये, अ प्रभाग वॉर्ड क्र.५ मोरेवस्ती या ठिकाणाचे साफसफाई कामी मे.भैरवनाथ स्वयं.सेवा सह. संस्था [निविदा रकमेच्या ७ % कमी एकुण र.रू.१३,७५,०५७/- [र.रू.तेरा लाख पंच्याहत्तर हजार सत्तावन्न] ] यांचेशी कामाचा करारनामा करणेस व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(नि.र.रू.१४,७८,५५६/-)

विषय क्रमांक- १९) मनपाच्या आरोग्य विभागाकडील नि.नो.क्र.४/२००८-०९ अन्वये, क प्रभाग वॉर्ड क्र.१७ सॅडविक कॉलनी या ठिकाणाचे साफसफाई कामी मे.स्वामी विवेकानंद स्वयं.सेवा सह. संस्था मर्या. [निविदा रकमेच्या ११ % कमी एकुण र.रू.९,३२,०४९/- [र.रू.नऊ लाख बत्तीस हजार एकोणपन्नास] ] यांचेशी कामाचा करारनामा करणेस व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(नि.र.रू.१०,४७,२४६/-)

विषय क्रमांक- २०) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६८ (२) तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम १५१ (४) व इतर अधिनियमातील तरतुदीनुसार आयुक्तांच्या वतीने कामकाज/कर्तव्ये पार पाडण्यासाठी आयुक्त यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नेमणूक करण्यास व आयुक्त यांना योग्य वाटेल अशा अधिकाऱ्याकडे विषयांकित नमुद केलेले अधिकार वेळोवेळी प्रदान करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २१) माध्यमिक शिक्षण विभागासाठी ३९५ नग ड्युल डेक्स (बेंच) खरेदीकामी मे.निर्मिती इंजिनियरींग, संत तुकारामनगर,पिंपरी यांचेबरोबर करारनामा करण्यास व येणाऱ्या एकूण र.रु.१४,९१,९१५/-चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २२) National Mission Mode Project for E-Governance in Municipalities या प्रकल्पांतर्गत म.न.पा.चे विविध विभागांचे संगणकीकरण करणेकामी Software तयार करणेकामीचे Request For Proposal (RFP) चे निविदा प्रसिद्धीचे जाहिरात बीलाचेपोटी संबंधीत वृत्तपत्र दै.टाईम्स ऑफ इंडिया,पुणे, दै.इकोनॉमिक टाईम्स मुंबई, दै.लोकमत पुणे यांना अदा करावयाची एकूण रक्कम रुपये १,०८,१४०/- अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २३) मा.आयुक्त यांचे कार्यालयासाठी खरेदी करण्यात आलेला प्रिंटर नादुरुस्ती झाल्याने मे.भुमिका इंफोटेक यांचेकडून स्पेअरपार्ट खरेदी करून सदर प्रिंटर चालु करून दिला असल्याने स्पेअरपार्ट खरेदी कामीच्या र.रु.१८,०००/- खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २४) श्री.विजय चव्हाण यांचे वाहन क्रमांक एम.एच.१४/ऐ.ई.२५०८ या वाहनाचे दि.१/६/०८ ते दि.३१/६/०९ व सुवर्णा टुर्स ॲण्ड टॅव्हल्स यांचे वाहन क्र.एम.एच.१४/ऐ.एम.३९३५ या वाहनाचे दि.१/२/०८ ते दि.३१/१२/०८ या कालावधीतील बिलाची अदायगी व मध्यवर्ती औषध भांडार विभागाकरिता कार्यालयीन कामकाजा साठी श्री.संजय शिनगारे यांचे वाहन क्र.एम.एच.१२/डि.टि. ४०५८ हे वाहन र.रू.६००/- प्रतिदिनी ८० किलोमिटर मर्यादे पर्यंत व ८० किलोमिटरच्या पुढे प्रति किलोमिटर र.रू.४=६० पैसे या दराने एप्रिल २००९ ते मार्च २०१० पर्यंत मुदतवाढ व येणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २५) E-mail Package चे पुढील एक वर्ष कालावधी करिता (दि.२७/९/२००९ ते २६/९/२०१०) नुतनीकरणाचे कामकाज निविदा न मागविता, करारनामा न करता थेट पध्दतीने Tech ९ Services यांचे मार्फत करणेत आलेले असल्याने सदर कामकाजा साठी येणाऱ्या र.रू.७९,४१६/- [र.रू.एकोणऐंशी हजार चारशे सोळा] (Including Service Tax १०.३ %) खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २६) मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.३/२००९-१० (E-Tendering) मधील अ.क्र.२ अन्वये, पिंपरी चिंचवड मनपा चे सेक्टर २३ निगडी येथील जलशुध्दीकरण केंद्रासाठी द्रवरूप स्वरूपातील पॉलिॲल्युमिनियम क्लोराईड पुरविणेकामी मे.एस.व्ही.एस.केमिकल कॉर्पोरेशन व मे.केमिकल पिपल यांची र.रू.११,२५०/- (र.रू.अकरा हजार दोनशे पन्नास) प्रति मे.टन दराची निविदा अनुक्रमे ७०:३० या प्रमाणात स्विकृत करणेस तसेच सदर खरेदीकामी येणाऱ्या खर्चास व वरील दोन ठेकेदारांशी याकामी करारनामा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(नि.र.रू.१,०१,०८,८००/- [र.रू.एक कोटी एक लाख आठ हजार आठशे])

विषय क्रमांक- २७) JNNURM प्रकल्पातील पाणीपुरवठा व जलनिःसारणाचे कामांची निविदा नोटीस प्रसिध्दी साठी जाहिरात खर्चापोटी दै.डी.एन.ए. यांना र.रू.३,११,५२०/- [र.रू.तीन लाख अकरा हजार पाचशे वीस] व दै.लोकमत यांना र.रू.२,२८,८००/- [र.रू.दोन लाख अठ्ठावीस हजार आठशे] अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २८) जैव वैद्यकीय घनकचऱ्याची विल्हेवाट लावणेसाठी पास्को एनवायरमेंटल सोलुशन प्रा.लि.यांनी १२०० नग नॉन क्लोरीनेटेड प्लास्टिक बॅगचा पुरवठा केला असल्याने त्यांना पुरवठ्याचे बिल र.रू.२,१२,८८०/- [र.रू.दोन लाख बारा हजार आठशे ऐंशी] निविदा न मागविता करारनामा न करता अदा करणेस कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २९) वॉर्ड क्र.५९ उर्वरित वाल्हेकरवाडी परिसरातील म.रा.वि.वि.कं. चे लघुदाब वाहिनीचे खांब व तारा हलविणेकामी वीजपर्यवेक्षण शुल्क र.रू.३५,५६०/- [र.रू.पस्तीस हजार पाचशे साठ] अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ३०) आनंदनगर झोपडपट्टी, चिंचवड येथे स्ट्रीट लाईटकरिता ट्रान्सफॉर्मर बसविणेचे कामाचे विजपर्यवेक्षण शुल्क र.रू. ३,०००/- [र.रू.तीन हजार] म.रा.वि.वि.कं.लि.यांस अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ३१) आकाशचिन्ह व परवाना विभागामार्फत नाशिक फाटा चौक, पुणे-मुंबई हायवे येथील सद्यस्थितीत असलेल्या जागेवरील आकाशचिन्ह जाहिराती प्रसिध्दीकामी ई-टेंडरींग व्दारे आलेल्या निविदांमध्ये मे.बिग इंडिया ग्रुप, प्राधिकरण यांनी निविदामध्ये दिलेला प्रती चौ.फुट प्रती महा दर र.रू.२६/- स्विकृत करणेस व कामाचा करारनामा २ वर्षासाठी करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ३२) मे.Science & Technology Park, पुणे यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील जैविक विविधता सर्वेक्षण, परिक्षण व संवर्धन, पवना व इंद्रायणी या नद्यांमधील निसर्ग विज्ञान अभ्यास, खाणी व ओसाड जमिनींचे पुनर्स्थापना / सुशोभिकरण करणेसाठी अभ्यास करून अहवाल सादर करणेकामी प्रस्तावात नमुद प्रमाणे अदा करण्यात आलेल्या आगाऊ रकमा व अंतिम बिलासह एकूण र.रू. १२,२९,७०१/- [र.रू.बारा लाख एकोणतीस हजार सातशे एक] रकमेचे

समायोजन करणेकामी र.रू. १२,२९,७०१/- [र.रू.बारा लाख एकोणतीस हजार सातशे एक] या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ३३) पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रोटरी क्लब, एस.एन.बी.पी. स्कुल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पिंपरी चिंचवड सायन्स कॉग्रेस २००९ कामी एकूण र.रू.१,५५,९६१/- [र.रू.एक लाख पंचावन्न हजार नऊशे एकसष्ठ] संबंधीत पुरवठा धारकांना अदा करण्यास व सदरचा खर्च हा निविदा, कोटेशन न मागविता थेट पध्दतीने करणेस कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ३४) पर्यावरण विषयक जनजागृती होणेकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरातील शाळांमध्ये पर्यावरण या विषयावर शालेय प्रश्नमंजुषा घेणेकरिता येणाऱ्या र.रू.२,६३,५००/- [र.रू. दोन लाख त्रेसष्ठ हजार पाचशे] या अंदाजित खर्चास तसेच सदर कार्यक्रमामध्ये समाविष्ट असलेला अनुषंगिक खर्चाकामी र.रू.१५,०००/- [र.रू.पंधरा हजार] आगाऊ रक्कम काढणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ३५) मनपाच्या उद्यान/वृक्षसंवर्धन विभागाकडील नि.नो.क्र.१ (१-अ) /२००९-१० अन्वये, अ प्रभागातील मनपाचे विविध उद्यानांचे देखभाल विकास व संरक्षण करणेकामी मे.तावरे कन्स.कं. या ठेकेदाराची निविदा र.रू.२=३६ प्रति चौ.मी. (येणारा एकूण वार्षिक खर्च र.रू.३९,९६,२९२/- [र.रू.एकोणचाळीस लाख शहान्नव हजार दोनशे ब्यान्नव]) या दराने आलेली निविदा सर्वात कमी दराची असल्याने त्याचेशी करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(नि.र.रू.५३,९३,०००/-)

विषय क्रमांक- ३६) मनपाच्या उद्यान/वृक्षसंवर्धन विभागाकडील नि.नो.क्र.१ (१-क) /२००९-१० अन्वये, क प्रभागातील मनपाचे विविध उद्यानांचे देखभाल विकास व संरक्षण करणेकामी मे.तावरे कन्स.कं. या ठेकेदाराची निविदा र.रू.२=४९ प्रति चौ.मी. (येणारा एकूण वार्षिक खर्च र.रू.२६,१४,२६१/- [र.रू.सव्वीस लाख चौदा हजार दोनशे एकसष्ठ]) या दराने आलेली निविदा सर्वात कमी दराची असल्याने त्याचेशी करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(नि.र.रू.३३,४४,०००/-)

विषय क्रमांक- ३७) मौजे आकुर्डी येथील सि.स.नं.४१८३ या मिळकतीतील रस्ता रूंदीने बाधित क्षेत्राचे मुल्यांकन र.रू.५४,६७५/- इतक्या रकमेस खाजगी वाटाघाटी समितीने दि.२५/६/०९ च्या बैठकीत मान्यता दिलेली असून सदर मुल्यांकनाची र.रू.५४,६७५/- श्री.एम.पी. सुतार यांना कळविण्यात आलेली असून श्री.एम.पी.सुतार यांनी सदर रक्कम मान्य असल्याचे कळविले असल्याने सदर रकमेस तसेच सदर प्रकरणी करावयाच्या खरेदी खताच्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ३८) मनपाच्या वाढीव हद्दीच्या भागश मंजूर विकास योजनेतील मौजे पुनावळे येथील आ.क्र.४/७४ए, मैलाशुध्दीकरण प्रकल्प या आरक्षणा खालील जागेचा विकास जेएनयुआरएम अंतर्गत करण्यासाठी सदर जागा मनपाच्या ताब्यात घेणे आवश्यक आहे मौजे पुनावळे येथील आ.क्र.४/६६, इडब्ल्यूएस (आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे) या प्रयोजनासाठीची जागाही मनपाच्या ताब्यात घेणे गरजेचे आहे. सदर आरक्षणाखालील जागा ताब्यात घेताना सदर जागांच्या १२.०० मी.रूंद पोचरस्त्यांखालील जागाही ताब्यात घेणे आवश्यक आहे सदर आरक्षित क्षेत्राच्या भूसंपादनाच्या खर्चास (भूसंपादन अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणे) मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ३९) सन २००९-१० चे अंदाजपत्रका मध्ये विद्युत मुख्य कार्यालया कडील यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय या लेखाशिर्षावर काही अत्यावश्यक कामांना शुन्य अथवा अपूरी तरतूद करणेत आलेली असून सदर कामावर इतर कामावरून रक्कम वर्ग करणे (वाढ / घट) अत्यावश्यक असल्याने प्रस्तावात नमुद प्रमाणे र.रू.२२,००,०००/- तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ४०) चिंचवड येथील पवनानगर येथील बॅडमिंटन हॉलच्या विद्युतीकरणाची दुरुस्ती करणे या संबंधीत कामाकरिता प्राप्त कोटेशन धारकापैकी लघुत्तम दरधारक मे.विमलाई इले.कार्पो. यांचेकडून सदर तातडीचे काम अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा १.२ % कमी दराने करून घेणेस व करारनामा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(अंदाजपत्रकीय र.रू.४९,९५७/-)

विषय क्रमांक- ४१) मनपाच्या वतीने १)विकास कामाचा माहितीपट (५ मिनिटे) २)मनपाच्या योजनांचा माहितीपट (५ मिनिटे) ३)शहराचा संक्षिप्त इतिहास योजना, विकास कामे यांचा एकत्रित माहितीपट (१० मिनिटे) असे एकूण तीन माहितीपट इंग्रजी, हिंदी व मराठी भाषेत तयार करणेकामी महाराष्ट्र शासनाच्या यादीवरील फिल्म निर्मात्याकडून दरपत्रक मागविणेत आले असता त्यामध्ये मे.किशोर पिक्चर्स, मुंबई यांचे दर सर्वात कमी र.रू. १,४०,०००/- [र.रू.एक लाख चाळीस हजार] प्राप्त झालेले असल्याने सदरचे दर स्विकृत करून त्यांचेबरोबर करारनामा करणेस व येणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ४२) मनपाच्या अ प्रभाग क्षेत्रात कुंडीविरहीत वॉर्ड योजने अंतर्गत घरोघरचा कचरा गोळा करणे कामकाजासाठी नि.नो.क्र. ३/२००७-०८ व त्याअनुषंगाने ठराव क्र.५६४० दि.२३/७/२००८ अन्वये नेमण्यात आलेल्या प्रस्तावात नमुद ठेकेदारांचे कामास दि.१/११/२००९ पासून एक वर्ष कालावधी साठी मुदतवाढ देणेस, त्यांच्याशी याकामी करारनामा करणेस व येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/७/कावि/१५०१/२००९
दिनांक : ३०/१०/२००९ चे लगत

टिप : प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.